# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि., मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, वडाळा, पी. बी. नं. ७१२०, मुंबई - ४०० ०३१.

# ४४ वा वार्षिक अहवाल

## २०२२-२३




राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि., मुंबई

## संचालक मंडळ

## (सन २०२२-२३ ते २०२६-२७)

| | |
|---|---|
| मा.श्री.अजय जव्हेरीलाल ब्रम्हेचा (अध्यक्ष) | दि लासलगांव मर्चंट्स को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा.सौ.वैशालीताई स्वप्निल आवाडे (उपाध्यक्षा) | जवाहर सहकारी बँक लि., कोल्हापूर |
| मा.श्री.प्रवीण यशवंत दरेकर (संचालक) | रायगड सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री.सिताराम बाबूराव आडसूळ (संचालक) | प्रोग्रेसिव्ह को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री.संदिप सिताराम घनदाट (संचालक) | अभ्युदय को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री.रत्नाकर विनायकराव कदम (संचालक) | दि ओझर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा.श्री.मिलिंद मोहन आरोलकर (संचालक) | डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., डोंबिवली |
| मा.श्री.विद्याधर वामनराव अनास्कर (संचालक) | विद्या सहकारी बँक लि., पुणे |
| मा.श्री.विजय प्रकाश ढेरे (संचालक) | पुणे मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., पुणे |
| मा.श्री.अनिल शिवाजीराव देसाई (संचालक) | रहिमतपूर सहकारी बँक लि., सातारा |
| मा.श्री.निपुण विलासराव कोरे (संचालक) | श्री वारणा सहकारी बँक लि., कोल्हापूर |
| मा.श्री.सत्यनारायण छगनलाल लोहिया (संचालक) | श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि., बीड |
| मा.श्री.सतिश भगवानदास गुप्ता (संचालक) | दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि., बुलढाणा |
| मा.श्री.शंतनू शरदचंद्र जोशी (संचालक) | दि अकोला अर्बन को-ऑप. बँक लि., अकोला |
| मा.श्री.सुनिल ओमप्रकाश देवडा (संचालक) | मराठवाडा अर्बन को-ऑप. बँक्स् असो. लि., औरंगाबाद |
| मा.श्री.चंद्रहास नटवरलाल गुजराथी (संचालक) | जळगांव जिल्हा अर्बन को-ऑप. बँक्स् असो. लि., जळगांव |
| मा.श्री.राजगोपाल मुरलीधर मिणीयार (संचालक) | सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असो.लि., सोलापूर |
| मा.डॉ.शशीताई भगवानराव अहिरे (संचालिका) | दि नाशिक जिल्हा महिला सहकारी बँक लि., नाशिक |
| मा.श्री.नानासाहेब संपतराव सोनावणे (संचालक) | जनकल्याण को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा.श्री.योगेश्वर सिताबनजी बन (संचालक) | शिक्षक सहकारी बँक लि., नागपूर |
| मा.श्री.अशोक भिकाजी शेळके (संचालक) | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि., अहमदनगर |
| मा.श्री.मिलिंद अनंत काळे (स्वीकृत संचालक) | दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., पुणे |
| मा.श्री.दत्ताराम अनंत चाळके (स्वीकृत संचालक) | अपना सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.सौ.सायली संजय भोईर (मुख्य कार्यकारी व सचिव) | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई |

★ ★ ★ ★ ★

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी क्र.: २४१३५७९७,२४१५११८५ • E-mail: admin@mucbf.com • web: www.mucbf.com


## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी दुपारी ०२:३० वाजता मा. अध्यक्ष श्री. अजय ब्रम्हेचा यांच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१' येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.

२. दि. २३ सप्टेंबर,२०२२ रोजी झालेल्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा. अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल, दि. ३१ मार्च, २०२३ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०२२-२३ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२३ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.

५. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६. फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता अंतर्गत लेखापरीक्षक आणि शासन मान्यताप्राप्त लेखापरीक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक :२९/०८/२०२३

ठिकाण : वडाळा, मुंबई-३१

**सायली भोईर**

मुख्य कार्यकारी व सचिव

विशेष सुचना: फेडरेशनने आयोजित केलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर सन २०२२-२३ मध्ये उत्तम कामगिरी केलेल्या सभासद नागरी सहकारी बँकांना फेडरेशनच्यावतीने सर्वोत्कृष्ट बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

टिप : १) किमान गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेपूर्वी (दुपारी १:०० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.

३) आर्थिक वर्ष २०२२-२३ चा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेला अहवाल, दोषदुरुस्ती अहवालासहीत फेडरेशनच्या वेबसाईटवर तसेच प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

## अध्यक्षीय भाषण

**फेडरेशनच्या सर्व नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्सचे सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो**!

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनच्या २०२२-२३ सालच्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्च्या सन्माननीय प्रतिनिधींचे मा. संचालक मंडळाच्यावतीने मी हार्दिक स्वागत करतो.

फेडरेशनचा सन २०२२-२३ चा ४४ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले फेडरेशनचे दि. ३१ मार्च, २०२३ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, त्यावर कार्यालयाने तयार केलेला दोषदुरुस्ती अहवाल, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचे अंदाजपत्रक तसेच नागरी सहकारी बँकांसंदर्भात नियमकांनी जारी केलेल्या ध्येय धोरणांची माहिती, संचालक मंडळातील सदस्यांच्यावतीने सादर करताना मला अतिशय आनंद व समाधान होत आहे.

आपण जाणतच आहात की, फेडरेशन ही राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन सर्व प्रकारचे कार्यालयीन कामकाज उत्तमप्रकारे व समाधानकारकपणे करुन आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी करत आलेली आहे.

त्याचप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणपूर्व समिती, स्थायी सल्लागार समिती, टॅफकब समिती इ.च्या माध्यमातून फेडरेशन सभासद नागरी सहकारी बँकांच्या विविध समस्यांचे निवारण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. रिझर्व्ह बँकेचे आर्थिक निकष व त्या राबविण्याच्या बाबी, वैधानिक बंधने, धोरणात्मक समस्या यासंदर्भात तसेच बँकांना दैनंदिन कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत पत्राद्वारे सतत मार्गदर्शन देखील फेडरेशन करीत असते.

त्याचबरोबर केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, सहकार खाते यांच्याकडून जारी केल्या जाणाऱ्या विविध योजनांबाबत तथा कायद्यातील घडामोडी इ. बाबत अद्ययावत माहिती नागरी सहकारी बँकांना उपलब्ध/अवगत करुन देण्याचे कार्य फेडरेशन करीत असते.

### फेडरेशनच्या चालू आर्थिक वर्षातील महत्त्वाच्या घडामोडी

अहवाल सालातील महत्त्वाच्या या घडामोडींमध्ये फेडरेशनतर्फे खालीलप्रमाणे प्रशिक्षण वर्ग, संवादसत्र इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संक्षिप्त स्वरुपात सादर करण्यात येत आहे.

### दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनच्या संचालक मंडळाची सन २०२२-२३ ते २०२६-२७ या पंचवार्षिक कालावधीसाठी निवडणूक

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई च्या संचालक मंडळाची सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीसाठीची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया मा. श्री. प्रताप पाटील, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे, मुंबई यांच्या

अधिपत्याखाली पार पाडली. तद्नंतर मा. अध्यासी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक श्री. प्रताप पाटील यांनी दि. ०८ डिसेंबर, २०२२ रोजी नवनिर्वाचित समिती सदस्यांमधून **मा. श्री. अजय जव्हेरीलाल ब्रम्हेचा** हे अध्यक्ष म्हणून तर **मा. सौ. वैशालीताई स्वप्निल आवाडे** या उपाध्यक्षा म्हणून निवडून आल्याचे जाहीर केले.

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशनतर्फे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांकरिता आयोजित केला जाणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' वितरण सोहळा**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशनतर्फे दि. २३ सप्टेंबर, २०२२ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे आयोजित केलेल्या **'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२२'** या वितरण कार्यक्रमास राज्यातील विविध नागरी सहकारी बँकांच्या सुमारे १५० हून अधिक प्रतिनिधींच्या उपस्थितीत फेडरेशनचे माजी अध्यक्ष **मा. श्री. विद्याधर अनास्कर** व मा. खासदार व फेडरेशनचे माजी ज्येष्ठ संचालक **श्री. आनंदराव अडसूळ** तसेच इतर मा. संचालकांच्या शुभहस्ते सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांना सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्रातील सभासद नागरी सहकारी बँकांमधून '**उत्कृष्ट काम**' करणाऱ्या बँकांची निवड करण्याकरिता, फेडरेशनतर्फे समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने ठरविलेल्या निकषांनुसार सुमारे ७६ अर्जांतून १५ विजेत्या सभासद नागरी सहकारी बँकांची सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

**'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार'** सोहळ्यास फेडरेशनचे मा. संचालक तसेच पुरस्कार विजेत्या नागरी सहकारी बँकांचे मा. पदाधिकारी व संचालक आवर्जून उपस्थित राहील्याबद्दल फेडरेशनचे **माजी** उपाध्यक्ष **मा. श्री. रमाकांत खेतान** यांनी त्यांचे आभार मानले. सदर सोहळ्याचे सूत्रसंचालन फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव **मा. सौ. सायली भोईर** यांनी केले.

★★★★

**प्रशिक्षण कार्यक्रम -**

महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४-अ(१) नुसार दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनला महाराष्ट्र राज्यामध्ये सहकार क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षणसाठी **राज्य शिखर प्रशिक्षण संस्था** म्हणून दि. १७ मे, २०२३ रोजी मान्यता दिली आहे. वर्षभरात फेडरेशनने सभासद बँकांचे पदाधिकारी, व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते.

१) फेडरेशनने नागरी सहकारी बँकांकरिता दि. मे २७, २०२२ रोजी `SARFAESI Act 2002' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमास बँकिंग तज्ञ मा. श्री. मोहन किनिंगे यांनी Various Important Provisions of SARFAESI Act 2002, Step by step action points for Authorized Officers on each section, sub-section and rules under the Act with practical tips, Servicing Notice u/s. 13(2), Reply to borrower's objections u/s. 13(3),



Practical Problmes, Practical Tips and Tacts to handle the Critical Borrowers and Prevention of Atrocity and Molestation Cases filed by the borrowers, 13(4) Peaceful, Symbolic, Physical Possession, Case Studies, Success Stories and Miserable failures of various banks' cases across the Country with reasons thereof, Overview of Compromise Settlements (Non OTS), Discussion on latest Supreme Court and High Court Judgements etc. या विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

२) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, उपप्रमुख तथा सहाय्यक व्यवस्थापक तथा इतर व्यवस्थापक वर्गासाठी दि. जून १८, २०२२ रोजी `Cyber Security' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे मा. सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. प्रविण भावसार उपस्थित होते. त्यांनी Importance of Comprehensive Cyber Security Framework, Cyber Security Controls for Third party ATM Switch Application Service Providers, Need for Secured Digital Banking, Regulatory Aspects of 'Technology Vision for Cyber Security' for UCBs – 2020-23 etc. या विषयांवर, तसेच सायबर तज्ञ मा. श्री. रविकिरण मंकीकर यांनी Importance of Effective Incident Response Management, Digital Payments Security Controls, Importance of Effective Business Continuity Planning, etc. या विषयांवर आणि मा. ॲड. जयश्री नांगरे यांनी "Cyber Security Hygiene" Policy and Other Policies, Compliance with Various Standards –PCI–DSS,PA-DSS,ISO-27001:2013, IT Act 2008, RBI, CERT-IN, Virus/Malware Attack, Introduction of Malicious Code or Unauthorized Access Leading to Data Breach and so on… या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



३) फेडरेशनने दि. जुलै १६, २०२२ रोजी नागरी सहकारी बँकांमधील गुंतवणूक विभागातील व्यवस्थापक आणि अधिकारी वर्गासाठी 'Customer Service' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून बँकिंग तज्ञ मा. श्री. शांताराम पाध्ये यांनी Introduction and Importance of Customer Service with reference to competition, Delighted Customer Service/Team Building/ Need for change skill, Grievances Handling Mechanism, Transforming Customer Complaints into opportunities, Audit of Customer Service इ. विषयांवर, तसेच बँकिंग तज्ञ मा. श्री. जी. बी. जोशी यांनी Various types of customers, Knowledge of banking products and services, Communication and Marketing Skill, Digital Banking and Customer Service या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



४) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी व केवायसी विभागातील महा व्यवस्थापक, वरिष्ठ व्यवस्थापक तथा प्रधान अधिकारी वर्गासाठी दि. ऑगस्ट २७, २०२२ रोजी `KYC and Anti-Money Laundering' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे महा व्यवस्थापक मा. श्री. संजय कुमार यांनी Importance and Elements of KYC, Concept of Money Laundering, Important Provisions in the Master Direction on KYC Guidelines, Role of FATF, Video based Customer Identification Process, etc. या विषयांवर तसेच रिझर्व्ह बँकेचे व्यवस्थापक मा. श्री. अंकुश धिमन यांनी Supervisory Expectations from UCBs for FATF, Risk Based Approach for KYC–AML या विषयांवर आणि आर.बी.एल. बँकेच्या वरिष्ठ उपाध्यक्षा, कु. अमिता आजगावकर यांनी Reportings to FIU–IND, Obligation of the Banks as Reportees, Identification of Beneficial Ownership, Identification and Monitoring of Suspicious Transactions, Red Flag Alerts, Re–KYC, C–KYC या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



५) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील शिपाई आणि वाहनचालक वर्गासाठी दि. ऑक्टोबर १६, २०२२ रोजी `Sub-staff and Drivers for UCBs' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून बँकिंग तज्ञ मा. श्री. शांताराम पाध्ये यांनी Role of Sub-staff, Drivers in the Present Scenario, Duties & Responsibilities, Marketing Skill, Recovery Skill, Team Role, Functional & Instrumental Role, Do's & Don'ts for them या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



६) दि. डिसेंबर ०३, २०२२ रोजी फेडरेशनने `Restructuring of Advances' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे उप महा व्यवस्थापक मा. श्री. जितेंद्र कुमार यांनी Regulatory aspects on Income Recognition, Asset Classification & Provisioning & Disclosure of Divergence या विषयांवर तसेच चार्टर्ड अकौटंट मा. श्री. अभिजित देशमुख यांनी Principal aspects of NPA Identification and Classification, Term Loan, Cash Credit Facility, Bill purchased/ discounted, Post-shipment credit, Other Aspects of NPA Classification including upgradation of accounts या विषयांवर तर चार्टर्ड अकौटंट मा. श्री. संजय राणे यांनी Prudential guidelines on Restructuring of Advances, Why and when Restructuring of loans is necessary?, Eligibility Criteria for Restructuring of Advances, Guidelines on Asset



Classification & Upgradation of Projects under Implementation या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

७) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, महा व्यवस्थापक, वरीष्ठ अधिकारी व कर्ज विभागातील मुख्य व्यवस्थापक तथा व्यवस्थापक वर्गासाठी दि. जानेवारी ३१, २०२३ रोजी `Credit Management' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून बँकिंग तज्ञ मा. श्री. शांताराम पाध्ये यांनी Credit Appraisal of Retail loans & Working Capital Finance, Decision Making Process, Analysis of Financial Statements, Credit Risk involved in various loans या विषयांवर तर बँकिंग तज्ञ मा. डॉ. जी. बी. जोशी यांनी Documentation for different types of loans, Marketing of loan products, Customer relationship या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



८) फेडरेशनने औरंगाबाद येथे आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील विशेष वसुली अधिकारी वर्गासाठी दि. फेब्रुवारी २८, २०२३ पासून दि. मार्च ०२, २०२३ पर्यंत `Special Recovery Officers of UCBs' या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून बँकिंग तज्ञ मा. श्री. नितीन वाणी यांनी Difference between Sections 101 and 91 of the MCS Act, 1960, Important Provisions under Sections 49, 101 and 98 of the MCS Act, 1960, Effective Recovery to be made under Section 156 (107) of the MCS Act, 1960, Procedure to be followed after taking possession of the Mortgaged Property, Measures to be taken to reduce Non-Performing Loans या विषयांवर तर बँकिंग तज्ञ मा. श्री. शांताराम पाध्ये यांनी Communication Skills and Leadership Qualities of Recovery Officer, Types of employees and Mentality of Recovery Employees या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



९) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील गुंतवणूक विभागातील अधिकारी वर्गासाठी दि. मार्च १८, २०२३ रोजी `Investment & Treasury Management' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे महा व्यवस्थापक मा. श्री. संजय कुमार यांनी Investment Policy – Contents/guidelines of recent circulars of the RBI, Classification and valuation of Securities – Valuation Norms and Provisioning. Introduction and importance of Investment and Treasury Management या विषयांवर तसेच गुंतवणूक सल्लागार मा. श्री. विवेक मांडलिक यांनी Theory of Fixed Income Bonds, Theory of Duration, Modified Duration, Pricing of Bonds, Government Securities, Treasury Bills –



Nature and Concept, Issue Procedure Primary dealers, Time Value of Money, Concept of Yield, Yield till maturity, Current Yield and Other Related Concepts या विषयांवर तर कोषागार सल्लागार मा. श्री. सुबोध कापडेकर यांनी Practical Sessions on various types of Portfolio and Risk Analysis, Concept of Market Risk, Interest Rate Risk relating to Investment, Use of other Instruments like CD, CP in Portfolio of Urban Co-operative Banks, Consistency of Interest Income, Market Risk Impact, Trading Gains, Analysis of Income vis a vis Depreciation Provisions, Trading Practices, Auctions, Bidding Techniques, SGL and CSGLया विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

★★★★

## कार्यशाळा

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनतर्फे माहे सप्टेंबर २०२२ आणि नोव्हेंबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे सभासद नागरी सहकारी बँकांमधील संचालक व महिला संचालिका यांचेकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या.**





१) दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनद्वारा आयोजित व दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक पुरस्कृत दि. सप्टेंबर १७, २०२२ रोजी वाशी, नवी मुंबई येथील प्रशिक्षण केंद्रात महिला संचालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

२) दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनद्वारा आयोजित व दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक पुरस्कत दि. नोव्हेंबर १९, २०२२ रोजी वाशी, नवी मुंबई येथील प्रशिक्षण केंद्रात नागरी सहकारी बँकांमधील सर्व संचालक प्रामुख्याने नवोदित संचालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रशिक्षण कार्यक्रमास फेडरेशनचे माजी अध्यक्ष मा. श्री. विद्याधर अनास्कर यांनी Effective Participation of Directors in Decision-making process in Board and other Meetings, Emerging Banking Concepts, their Aims and Objects, Important Provisions in various important Acts related to Banking, Co-operative Culture, Core Values and Ethics, etc.

या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. तर प्रमुख व्याख्यात्या म्हणून रिझर्व्ह बँकेच्या उप महा व्यवस्थापिका मा. श्रीमती भाग्यलथा कौशिक यांनी Regulatory Expectations from Directors of UCBs for Strengthening the Sector या विषयांवर महिला संचालिकांना मार्गदर्शन केले तसेच रिझर्व्ह बँकेचे महा व्यवस्थापक मा. श्री. रंजीव शंकर यांनी Role and Functions of Directors, Regulatory Expectations from Directors of UCBs for Strengthening the Sector etc. या विषयांवर नागरी सहकारी बँकांमधील सर्व संचालक प्रामुख्याने नवोदित संचालकांना मार्गदर्शन केले.

वरील सर्व प्रशिक्षण कार्यक्रमास तसेच कार्यशाळेस मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, नाशिक, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, धुळे, बीड, औरंगाबाद, अहमदनगर, जळगाव, लातूर, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, हिंगोली, अकोला, नंदुरबार, उस्मानाबाद, बुलढाणा, चंद्रपूर, जालना, परभणी इ. जिल्हयातील एकूण ११७८ प्रशिक्षणार्थींनी विविध बँकिंग विषयांवर मार्गदर्शन घेतले. उपस्थित प्रशिक्षणार्थींनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे, समस्यांचे समाधानकारक निवारण मा. व्याख्यात्यांनी केले.

★★★★

**टॅफकॅब सभा**





भारतीय रिझर्व्ह बँकेने महाराष्ट्रासाठी निर्माण केलेल्या स्टेट लेवल टास्कफोर्सच्या मुंबई विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक मा. श्री. विद्याधर अनास्कर, तर नागपूर विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे संचालक मा. श्री. सतिश गुप्ता तसेच बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी असलेल्या टॅफकबच्या सभांसाठी फेडरेशनचे संचालक मा. श्री. सि.बा.आडसूळ हे उपस्थित राहून नागरी सहकारी बँकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील होते. तथापि दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजीच्या संचालक मंडळ सभेत पारित झालेल्या ठरावानुसार मुंबई प्रादेशिक विभागाकरिता असलेल्या टॅफकब सभेकरिता फेडरेशनचे अध्यक्ष मा. श्री. अजय ब्रम्हेचा, नागपूर प्रादेशिक विभागासाठी असलेल्या टॅफकब सभेकरिता फेडरेशनचे संचालक मा. श्री. सत्यनारायण लोहिया तर बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी असलेल्या टॅफकब सभेसाठी फेडरेशनचे संचालक मा. श्री. सुनिल देवडा हे नागरी सहकारी बँकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याकरिता टॅफकबवरील बँकांची पूर्वसभा बोलावून बँकांच्या समस्या जाणून घेऊन त्या टॅफकब समितीसमोर फेडरेशनचे अध्यक्ष व संचालकांमार्फत मांडल्या जातात. अशा वेळी फेडरेशनतर्फे या

बँकांना त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता मोलाचे मार्गदर्शन अथवा या बँकांच्या विनंतीवरुन त्यांचे दुसऱ्या सक्षम नागरी सहकारी बँकेमध्ये विलीनीकरणाकरिता सहकार्य वेळोवेळी केले जाते.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागातर्फे १ सभा, नागपूर विभागातर्फे ५ सभा, तथा केंद्रीय विभागातर्फे बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी १ टॅफकब सभा घेण्यात आली.

★★★★

**सभासदत्व**

अहवाल सालात प्रिमियर ऑटो एम्प्लॉईज को-ऑप. बँक लि., मुंबई, दि लक्ष्मी को-ऑप. बँक लि., सोलापूर, शिवाजीराव भोसले सहकारी बँक लि., पुणे, दि सेवा विकास सहकारी बॅक लि., पुणे, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे, श्री आनंद को-ऑप. बँक लि., पुणे, सर्जेरावदादा नाईक शिराळा सहकारी बँक लि., सांगली, श्री स्वामी समर्थ अर्बन को-ऑप. बँक लि., उस्मानाबाद, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर अर्बन को-ऑप. बँक लि., लातूर, बाबाजी दाते महिला सहकारी बँक लि., यवतमाळ इ. बँकांचे परवाने रद्द करण्यात आल्याने व कच्छ को-ऑप. बँक लि., मुंबई, श्री शारदा सहकारी बँक लि., पुणे, चौंडेश्र्वरी सहकारी बँक लि., कोल्हापूर या बँकांचे अनुक्रमे भूज मर्कंटाइल को-ऑप. बँक लि., गुजरात, दि कॉसमॉस सहकारी बँक लि., पुणे व जनता सहकारी बँक लि., पुणे या बँकांमध्ये विलीनीकरण झाल्याने आणि तसेच दि सुटेक्स को-ऑप. बँक लि., गुजरात ही फेडरेशनची आर्थिक वर्षात सहयोगी सभासद झाल्याने दिनांक ३१ मार्च,२०२३ अखेर ४६० नागरी सहकारी बँका, २ सहयोगी सभासद व १८ नागरी सहकारी बँकांची विभागीय/जिल्हा असोसिएशन्स मिळून फेडरेशनची एकूण सभासद संख्या ४८० झाली आहे.

महाराष्ट्र राज्यातील ज्या नागरी सहकारी बँका अद्यापही फेडरेशनच्या सभासद झालेल्या नाहीत, त्यांना फेडरेशनचे सभासद होण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात येत आहे.

★★★★

**राष्ट्रीय पातळीवरील संस्था**

सभासद बँकाना मार्गदर्शन करत असताना आपली फेडरेशन राष्ट्रीय पातळीवरील इतर संस्थांशी देखील सलोख्याचे संबंध ठेवून आहे. सहकार, बँकिंग व व्यापार उदीम क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील खालील संस्थांची फेडरेशन सभासद आहे.

- नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडिया, नवी दिल्ली
- नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप.बँक्स ॲण्ड क्रेडीट सोसायटीज लि., नवी दिल्ली
- इंडियन मर्चन्टस चेंबर, मुंबई
- इंडियन बँक्स् असोसिएशन, मुंबई
- इंडियन इन्स्टिटयुट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनॅन्स्, मुंबई

वरील मान्यवर संस्थांकडून आलेली माहिती फेडरेशनच्या सर्व सभासद बँकांना वेळोवेळी वितरीत केली जाते.

★★★★

**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

फेडरेशन MBA आणि Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा बँकिंग आणि सहकार विषयक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यास सर्वतोपरी मदत करीत असते. राज्याच्या विविध भागातून, जिल्ह्यांमधून भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक बाबी, सहकारी बँकांचा इतिहास आणि अलीकडील बँकिंग क्षेत्रातील घडामोडी इ. बाबत माहिती जाणून घेण्यासाठी अनेक विद्यार्थी फेडरेशनशी संपर्क साधत असतात किंवा कार्यालयास भेटी देत असतात.

★★★★

**स्थायी सल्लागार समिती सभा**






दि. ०६ जानेवारी, २०२३ रोजी रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मा.श्री. एम. राजेश्वर राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ३५ व्या स्थायी सल्लागार समिती सभेमध्ये फेडरेशनने महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांना भेडसावणाऱ्या विविध धोरणात्मक समस्या त्यांचे निराकरण करण्यासाठी सादर केल्या होत्या.

सदर समितीमध्ये फेडरेशनचे मा. अध्यक्ष श्री. अजय ब्रम्हेचा व मा. मुख्य कार्यकारी सचिव सौ. सायली भोईर यांनी आपले मोलाचे योगदान दिले.

★★★★

**नोकरभरती धोरण**

महाराष्ट्र शासनाने दि. २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील भरती प्रक्रियेच्या ऑनलाइन अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. त्यानुसार ऑनलाईन भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी निकष ठरवण्यासाठी मा. सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयातर्फे समिती स्थापन करण्यात आली होती.

सदर समितीमध्ये फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी आणि सचिव यांची देखील नियुक्ती करण्यात आली असता त्यांनी नागरी सहकारी बँकांमध्ये ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यासाठी भरती धोरण तयार करण्यामध्ये आपले योगदान दिले आहे. तद्नंतर दि. १४ जून, २०२२ रोजी मा.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार फेडरेशनचा समावेश राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रिया राबविणेसाठीच्या एजन्सी पॅनेलमध्ये केला आहे. त्यानुषंगाने फेडरेशनतर्फे राज्यातील नागरी सहकारी बँकांमध्ये नोकरभरती प्रक्रिया, बढती परीक्षा व मुलाखत प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

★★★★

**बँकिंग नियमन (दुरुस्ती) कायदा - २०२० - मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल**

बँकिंग नियमन (दुरुस्ती) कायदा - २०२० मधील अनेक तरतुदी या समस्त सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अस्तित्वाच्या दृष्टीने हितावह नसून या क्षेत्रास खाजगीकरणाचा पर्याय सुचविणाऱ्या असल्याने



तसेच सहकारी संस्थांचा कायदा, नियम, उपविधी, त्यातील तरतुदी तथा सहकारी तत्वांना छेद देणाऱ्या असल्याने या कायद्यास विरोध करणेसाठी फेडरेशनतर्फे मुंबई उच्च न्यायालयात दि. ०३ मार्च, २०२२ रोजी याचिका दाखल करणेत आली होती. दरम्यान रिझर्व्ह बँकेने देशातील विविध राज्यातील नागरी सहकारी बँका तथा त्यांच्या फेडरेशन्स त्यांचेविरुध्द या राज्यांमधील विविध न्यायालयात दाखल केलेल्या सर्व याचिका एकत्रित करुन मा. सर्वोच्च न्यायालय येथे वर्ग करण्याची विनंती मा. सर्वोच्च न्यायालयात केली होती. परिणामी फेडरेशनला मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात देखील अंतरिम अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करणे भाग पडले. मा. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज दाखल करणेकरिता फेडरेशनच्या वतीने ॲड. अभय अंतुरकर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

तथापि तत्पुर्वी देशातील कोणत्याही एका उच्च न्यायालयात प्राथमिक स्तरावर सदर याचिकांची एकत्रित सुनावणी व्हावी व त्याकरिता मुंबई उच्च न्यायालयाला प्राधान्य देण्यात यावे, अशी विनंती फेडरेशनतर्फे देशातील सर्व याचिकाकर्त्यांना करण्यात आली होती. मात्र बिग कांचीपूरम को-ऑप. बँकेने, 'बँकिंग नियमन (दुरुस्ती) कायदा – २०२०' विरोधात सर्वप्रथम याचिका दाखल केली असल्याने अशाप्रकारे एखाद्या राज्यात एकत्रित केलेल्या याचिकेसंदर्भात सुनावणी घेणेकरिता मा. मद्रास उच्च न्यायालयास प्राधान्य देण्यात यावे, अशी विनंती मा. सर्वोच्च न्यायालयात केली असता याचिकाकर्त्यांची ती विनंती मान्य होऊन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सर्व एकत्रित केलेल्या याचिका मा. मद्रास उच्च न्यायालय येथे वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

सध्या मा. मद्रास उच्च न्यायालयात सदरहू खटल्याची सुनावणी सुरु असून फेडरेशनतर्फे याचिकेच्या नोंदणीकरिता व बँकिंग नियमन (दुरुस्ती) कायदा – २०२० मधील सहकारी बँकिंग क्षेत्रास हितावह नसणाऱ्या तरतुदींविरोधात सहकारी बँकांची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी ॲड. अनिल अंतुरकर यांचेसह ॲड. सिलंबू सेल्वन या वकिलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

★★★★

## आर्थिक प्रगतीचा आलेख

अहवाल वर्षातील ठळक घडामोडीवरुन आपल्या निदर्शनास आले असेलच की, नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीकरिता फेडरेशन सदैव सक्रिय राहीलेली आहे आणि म्हणूनच ती खऱ्या अर्थाने नागरी सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था म्हणून गणली जाते. गेल्या वर्षभरात ई-मेलच्या माध्यमातून तथा लेखी पत्रांद्वारे नागरी सहकारी बँकांनी त्यांच्या समस्या, अडचणी प्रश्नरुपाने फेडरेशनला सादर केल्या व त्याची त्वरीत दखल घेऊन फेडरेशनही त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तत्पर राहीली आहे.

सन २०२२-२३ हे आर्थिक वर्ष आव्हानात्मक असूनही फेडरेशनने सर्व स्तरावर दिमाखदार कामगिरी करत आपला स्तर सातत्याने उंचावत नेला आहे. फेडरेशनच्या या प्रगतीचा मुद्देसुद तपशील वाढावा विभागणीसह मी आपणांसमोर सादर करीत आहे.

## वाढावा विभागणी

दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर फेडरेशनला प्राप्त झालेल्या उत्पन्नातून खर्च व तरतुदी वजा जाता शिल्लक राहिलेला वाढावा व त्यात गतवर्षीचा उरलेला वाढावा मिळविता एकूण रु. ९,३८,७३०.३३ पैसे फक्त वाढाव्याच्या स्वरुपात शिल्लक राहिले आहेत.

सदर वाढाव्याची खालीलप्रमाणे विभागणी करण्यात आली असून त्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. तरी सदर वाढावा विभागणीस अंतिम मंजूरी देण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी २५% | रु. २,३५,०००.०० |
| इमारत आणि विकास निधी | रु. २,००,०००.०० |
| अनपेक्षित देणी निधी | रु. १,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | रु. १,००,०००.०० |
| रजा रोखीकरण निधी | रु. ३,०३,५००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | रु. २३०.३३ |
| **एकूण** | **रु. ९,३८,७३० .३३** |

★★★★

## संचालक मंडळ सभा

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ५ सभा व उपसमितीच्या ५ सभा घेण्यात आल्या. सदर सभांमध्ये नागरी सहकारी बँकांच्या विविध प्रश्नांसंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. मा. संचालकांनी आपले यथोचित योगदान या सभांद्वारे प्रदान केले.

★★★★

## हिशेब पत्रके

सन २०२२-२३ या आर्थिक सालासाठी फेडरेशनच्या जिंदगी व देयता तसेच उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

**जिंदगी व देयता :** **(रु. लाखात)**

| जिंदगी | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२३ |
|---|---|---|
| रोख व बँकांमधील शिल्लक | ९९.६० | ८.३६ |
| गुंतवणूक | ६१७.५३ | ७८८.६६ |
| स्थायी मालमत्ता | २०.२७ | १८.५५ |
| लिज्ड् प्रिमायसेसवर आकारलेला प्रिमीअम | ३०.०० | ३०.०० |
| संकीर्ण येणी | ११३.९५ | ९९.४३ |
| **एकूण** | **८८१.३५** | **९४५.००** |

| देयता | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२३ |
|---|---|---|
| राखीव निधी | ९६.५३ | ९८.८५ |
| इमारत आणि विकास निधी | ३३३.६० | ३३५.६० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी फंड | १०९.४९ | १२०.४९ |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | ६७.०६ | ७३.७८ |
| अमोरटायझेशन निधी | १५.२५ | १५.७५ |
| अनपेक्षित देणी निधी | ७४.३७ | ७५.३७ |
| कर्मचारी कल्याण खर्च | ५६.४४ | ५७.४४ |
| निवडणूक निधी | २.०० | १.०० |
| गुंतवणूकीकरिता खास निधी | ०.०० | ३५.०० |
| कायदेशीर शुल्क निधी | ०.०० | १२.९० |
| बृहन्मुंबई ना.सह.बँक्स् असो. कडून मिळालेले प्रिमियम | ७.४५ | ७.४५ |
| चालू देणी व तरतुदी | १०९.९० | १०१.९८ |
| एकूण वाढावा (गतवर्षीचा वाढावा मिळवून) | ९.२६ | ९.३९ |
| **एकूण** | **८८१.३५** | **९४५.००** |

**उत्पन्न व खर्च** **(रु. लाखात)**

| उत्पन्न | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२३ |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | १०२.५१ | १२५.९९ |
| गुंतवणूकीवर व इतर बाबींवर मिळालेले व्याज | ४१.१० | ३९.४१ |
| इतर उत्पन्न | ४६.७६ | ४१.५८ |
| **एकूण** | **१९०.३७** | **२०६.९८** |

| खर्च | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२३ |
|---|---|---|
| प्रशासकीय खर्च | ५६.२३ | ८२.५० |
| कार्यालयीन खर्च | ४.८९ | ६.२२ |
| फी, कमिशन | ३.१५ | ४.७१ |
| घसारा | ३.०२ | २.८५ |
| मालमत्ता खर्च (भाडे, कर, विमा इ.) | ५.७५ | ६.६० |
| इतर खर्च | १६.०७ | २९.०२ |
| विविध निधींमध्ये वर्ग | ९२.०० | ६५.७० |
| खर्च वजा जाता वाढावा | ९.२६ | ९.३८ |
| **एकूण** | **१९०.३७** | **२०६.९८** |

**उत्पन्न, खर्च व वाढाव्याचा तुलनात्मक तपशील** **(रु.लाखात)**

| तपशील | ३१/०३/२०२० अखेर | ३१/०३/२०२१ अखेर | ३१/०३/२०२२ अखेर | ३१/०३/२०२३ अखेर |
|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | १९३.५२ | १३६.७१ | १९०.३७ | २०६.९८ |
| **खर्च** | १८५.५२ | १२८.७० | १८१.११ | १९७.६० |
| **वाढावा** | ८.०० | ८.०१ | ९.२६ | ९.३८ |

फेडरेशनने २०२२-२३ या आर्थिक वर्षात सभासद बँकांकडून वसूल केलेली चालू वर्षाची वर्गणी तसेच थकीत वार्षिक वर्गणी, विविध बँकांमधील ठेवींमध्ये केलेली गुंतवणूक, प्रशिक्षण व अनुदान तसेच कायदेशीर शुल्क व नोकरभरती परीक्षा शुल्क इ. मुळे फेडरेशनला सुमारे २०६.९८ लाखाचे उत्पन्न प्राप्त झाले असून आजपर्यंतचे हे फेडरेशनचे सर्वाधिक विक्रमी उत्पन्न आहे. या उत्पन्नातून इतर खर्च व तरतुदी वजा जाता फेडरेशनला सुमारे ७५.०८ लाखाचा एकूण वाढावा प्राप्त झाला आहे. सदर वाढाव्यातून सुमारे ६५.७० लाखाची रक्कम विविध निधींमध्ये वर्ग करण्यात येऊन निव्वळ वाढावा रु. ९.३८ लाख इतका शिल्लक राहिलेला आहे. फेडरेशनची गुंतवणूक व बँकेतील शिल्लक रु. ७१७.१३ लाखावरुन रु. ७९७.०२ लाखाचे वर झाली आहे. फेडरेशनची गुंतवणूक ही आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या नागरी सहकारी बँकांमध्ये, शासकीय रोख्यांमध्ये तसेच युनिटी स्मॉल फायनॅन्स बँकेच्या इक्विटी वॉरंट तथा प्रिफरन्स शेअर्समध्ये करण्यात आलेली आहे. तसेच राखीव व इतर निधीमध्ये जवळजवळ ९.५०% इतकी वाढ झालेली असून मार्च, २०२३ अखेर राखीव व इतर निधी सुमारे रु. ८२६.१८ लाख झालेला आहे.

★★★★

## लेखापरीक्षण

फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता अंतर्गत लेखापरीक्षण करण्यासाठी **मेसर्स एस. डी. साटम ॲण्ड कंपनी,** चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची **'अंतर्गत लेखापरीक्षक'** म्हणून नेमणूक

करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि. १२ मे, २०२३ रोजी अंतर्गत लेखापरीक्षण करुन आपला अहवाल कार्यालयास सादर केला आहे. तसेच वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी शासन मान्यताप्राप्त पॅनेलवरील 'अ' गटातील **मेसर्स संजय राणे ॲण्ड असोसिएटस्,** चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची **'वैधानिक लेखापरीक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी दि. २८ जून, २०२३ रोजी आपला वैधानिक लेखापरीक्षण अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

मा. वैधानिक लेखापरीक्षक **मेसर्स संजय राणे ॲण्ड असोसिएटस्,** चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी फेडरेशनला लेखापरीक्षण वर्ग 'अ' दिलेला आहे. त्यांनी फेडरेशनच्या कामकाजामध्ये लेखापरीक्षणाच्या आधारे बहुमोल मार्गदर्शन करुन फेडरेशनच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्याबद्दल फेडरेशनतर्फे त्यांचे व त्यांच्या सहकारी वर्गाचे मन:पूर्वक आभार.

★★★★

**कर्मचारी वर्ग**

फेडरेशनच्या सेवेत एक मुख्य अधिकारी - हिशेब व प्रशासन, तीन लिपीक, एक वाहनचालक व एक शिपाई इतका कायम कर्मचारी वर्ग व २ कंत्राटी कर्मचारी असून **मा.सौ.सायली भोईर** या फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव म्हणून काम पाहतात.

★★★★

**अभिनंदन**

❖ महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४-अ(१) नुसार दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनला महाराष्ट्र राज्यामध्ये सहकार क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षणसाठी **राज्य शिखर प्रशिक्षण संस्था** म्हणून दि. १७ मे, २०२३ रोजी मान्यता दिली आहे.

❖ मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाने दि. १४ जून, २०२२ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार फेडरेशनचा समावेश राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील **नोकरभरती** प्रक्रिया राबविणेसाठीच्या एजन्सी पॅनेलमध्ये केला आहे.

❖ को-ऑपरेटिव्ह बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेवर फेडरेशनचे संचालक व दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., पुणे या बँकेचे अध्यक्ष **मा. श्री. मिलिंद काळे** यांची **उपाध्यक्षदी** निवड करण्यात आली आहे.

❖ को-ऑपरेटिव्ह बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेवर फेडरेशनचे संचालक व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक **मा. श्री. विद्याधर अनास्कर** यांची **संचालकपदी** निवड करण्यात आली आहे.

**फेडरेशनच्या परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन.**

★★★★

**भावपूर्ण श्रद्धांजली**

अहवाल सालात खालील मान्यवर, प्रतिष्ठित व्यक्तिंना देवाज्ञा झाली. त्यांना फेडरेशनच्या परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

❖ समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा, माजी गृहमंत्री **मुलायम सिंग यादव** यांचे दि. १० ऑक्टोबर, २०२२ रोजी निधन झाले.

❖ लोकसभा सदस्य व माजी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री **गिरीश बापट** यांचे दि. २९ मार्च, २०२३ रोजी निधन झाले.

❖ माजी लोकसभा सदस्य **माणिकराव गावित** दि. १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

❖ माजी विधानपरिषद सदस्य **विनायक मेटे** यांचे दि. १४ ऑगस्ट, २०२२ रोजी अपघाती निधन झाले.

❖ जगविख्यात संतूरवादक, प्रयोगशील संगीतकार व संतूर वाद्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देणारे पद्मभूषण **पंडित शिवकुमार शर्मा** यांचे दि. १० मे, २०२२ रोजी हृदयविकाराने निधन झाले.

❖ जेष्ठ सुप्रसिद्ध गायिका पद्मभूषण **वाणी जयराम** यांचे दि. ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

❖ सुप्रसिद्ध निसर्ग कवी पद्मश्री **ना. धो. महानोर** यांचे दि. ०३ ऑगस्ट, २०२३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

❖ सोज्वळ व वात्सल्यपूर्ण अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री पद्मश्री **सुलोचना लाटकर** यांचे  दि. ०४ जून, २०२३ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले.

❖ जेष्ठ गणितज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि लेखिका **डॉ. मंगला नारळीकर** यांचे दि. १७ जुलै, २०२३ रोजी दिर्घ आजारामुळे निधन झाले.

❖ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे विद्यमान जेष्ठ संचालक व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक तथा सुवर्णा नागरी पतसंस्थेचे संस्थापक **भास्करराव उर्फ आबासाहेब कोठावदे** यांचे दि. २४ मे, २०२२ रोजी निधन झाले.

❖ टाटा समुहाचे माजी अध्यक्ष व भारतातील प्रसिध्द उद्योगपती **सायरस मिस्त्री** यांचे दि. ०४ सप्टेंबर, २०२२ रोजी अपघाती निधन झाले.

❖ राष्ट्रीय पुरस्कार प्राप्तसुप्रसिद्ध कला दिग्दर्शक, निर्माते **नितीन देसाई** यांचे दि. ०२ ऑगस्ट, २०२३ रोजी निधन झाले.

❖ सुप्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व पटकथाकार **सतिश कौशिक** यांचे दि. ८ मार्च, २०२३ रोजी हृदयविकाराने निधन झाले.

❖ मराठी चित्रपटसृष्टी गाजवणारे प्रसिद्ध अभिनेते **रविंद्र महाजनी** यांचे दि. ११ जुलै, २०२३ रोजी हृदयविकाराने निधन झाले.

❖ मराठी रंगभूमीवरचे 'बॅरिस्टर', राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त जेष्ठ अभिनेते **विक्रम गोखले** यांचे दि. २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

❖ वृत्त निवेदनातून आपल्या आवाजाने घराघरात पोहचलेले, बातम्या, घडामोडींच्या क्षेत्रातील जाणकार आणि निखळ व्यक्तिमत्त्व **प्रदीप भिडे** यांचे दि. ०७ जून, २०२२ रोजी आजारामुळे निधन झाले.

❖ शैलीदार लेखक व गप्पांची मैफल रंगविणारे बहारदार वक्ते, सिनेमा, क्रिकेट आणि राजकारणावर अशा सर्वांगीण शाखांमध्ये विपुल लेखन करणारे जेष्ठ पत्रकार **शिरीष कणेकर** यांचे दि. २५ जुलै, २०२३ रोजी निधन झाले.

❖ मराठी आणि हिंदी मनोरंजन विश्वात आपल्या उत्तम अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री **सीमा देव** यांचे दि. २४ ऑगस्ट, २०२३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

❖ महात्मा फुले यांचे विचार, साहित्याचे अभ्यासक, संशोधक, विविध चळवळींना वैचारिक अधिष्ठान देणारे आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्नशील असणारे **प्रा. हरी नरके** यांचे दि. १० ऑगस्ट, २०२३ रोजी हृदयविकाराने निधन झाले.

याशिवाय देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान, थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रीडा इ. क्षेत्रातील ख्यातीप्राप्त व लोकप्रिय व्यक्ती तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन पावलेल्या इतर ज्ञात-अज्ञात, निरपराध दिवंगत व्यक्तींना फेडरेशनतर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

★★★★

**आभार व ऋणनिर्देश**

अहवालसाली खालील व्यक्तींनी/संस्थांनी फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजात मोलाचे सहाय्य व मार्गदर्शन केले.

राज्याचे मुख्यमंत्री **मा.श्री. एकनाथ शिंदे**, उपमुख्यमंत्री **मा.श्री.देवेंद्र फडणवीस व मा. श्री. अजितदादा पवार**, माजी सहकारमंत्री **मा.श्री. अतुल सावे**, विद्यमान सहकारमंत्री **मा.श्री. दिलिप वळसे पाटील**, माजी केंद्रीय कृषी मंत्री व खासदार **मा.श्री.शरदचंद्रजी पवार**, सहकार विभागाचे प्रधान सचिव **मा.श्री. अनुप कुमार**, सहकार आयुक्त **मा.श्री.अनिल कवडे**, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्त **मा.डॉ.जगदीश पाटील**, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर **मा. श्री. शक्तिकांत दास**, रिझर्व्ह बँकेचे संचालक **मा. श्री. सतीश मराठे**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट

ऑफ को-ऑप.बँकिंग रेग्युलेशन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री. एम.राजेश्वर राव**, कार्यकारी संचालक **मा.श्री. सौरव सिन्हा**, मुख्य सरव्यवस्थापक **मा.श्री. आर. लक्ष्मीकांत राव**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग सुपरव्हिजन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री. एम. के. जैन**, कार्यकारी संचालक **मा. श्री. एस. सी. मुरमु**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ सुपरव्हिजनचे मुख्य सरव्यवस्थापक **मा. श्री. अर्नब कुमार चौधरी**, उपनिबंधक (अर्बन बँका) **मा.डॉ. आनंद कटके**, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कृषी बँकिंग कॉलेजचे प्रिन्सीपाल **मा.श्री. व्ही. जी. सेकर**, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप. बँक्स् ॲण्ड क्रेडिट सोसायटीज्‌चे अध्यक्ष **मा.श्री.ज्योतिंद्र मेहता**, नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडियाचे अध्यक्ष **मा.श्री. दिलीप संघानी**, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक **मा. श्री. विद्याधर अनास्कर** व कार्यकारी संचालक **मा.श्री. डी. एन. दिघे**, फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षक **मे. संजय राणे ॲण्ड असोसिएटस्**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई व अंतर्गत लेखापरीक्षक **मे.एस.डी.साटम ॲण्ड कंपनी** चार्टर्ड अकौटंट, मुंबई तसेच फेडरेशनच्या यशस्वी वाटचालीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती, नागरी सहकारी बँका, या बँकांच्या जिल्हा व विभागीय असोसिएशन्स, फेडरेशनच्या विविध उपक्रमास लोकाभिमुख करणारी प्रसिध्दी माध्यमे आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे मी याप्रसंगी आभार मानतो.

फेडरेशनच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत असताना, सभासद नागरी सहकारी बँका/जिल्हा-विभागीय असोसिएशन्सच्या पदाधिकाऱ्यांनी फेडरेशनला दिलेला सक्रिय पाठिंबा, सहकार्य तसेच फेडरेशनचे कामकाज करताना केलेल्या सूचना फेडरेशनला नेहमीच मार्गदर्शक ठरल्या आहेत. फेडरेशनची उद्दिष्टे नजरेसमोर ठेऊन सभासद बँकांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी तसेच माझ्या सहकाऱ्यांनी सातत्याने केला आहे, त्याचे फलित म्हणूनच आपल्या सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. ही जबाबदारी पेलताना प्रत्येक संचालकांनी दिलेल्या सहकार्याबरोबर विद्यमान उपाध्यक्षा **मा.सौ. वैशालीताई आवाडे** यांनी दिलेली मोलाची साथ तसेच मुख्य कार्यकारी व सचिव **सौ.सायली भोईर** व सेवक वर्ग या सर्वांनी फेडरेशनचे कामकाज करण्यामध्ये मला उत्तम सहकार्य केले आहे, त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. आजवरचा हा विश्वास, जिव्हाळा, प्रेम व सहकार्य असेच कायम राहो ह्याच अपेक्षांसह फेडरेशनच्या सेवेसाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन पुनश्च देवून मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभासद बंधू-भगिनींनो, सन २०२२-२३ च्या अहवालासंबंधातील माहितीचे विवेचन मी आतापर्यंत आपणांस या भाषणाच्या निमित्ताने सादर केले आहे. यानंतर विषय सूचीप्रमाणे दि. ३१ मार्च, २०२३ रोजीचे ताळेबंद पत्रक व आयव्यय पत्रक, आगामी वर्षाचे अंदाज पत्रक इत्यादींचा तपशील या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आला आहे. आपणाकडे सादर केलेला अहवाल, आय-व्यय पत्रक, ताळेबंद पत्रक, वाढावा विभागणी आणि अंदाज पत्रक आपण स्वीकृत करावे तसेच फेडरेशनच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आपण सर्वांनी सहकार्याचा हातभार लावावा ही नम्र विनंती.

जय हिंद । जय महाराष्ट्र । जय सहकार ।

**अजय ब्रम्हेचा**
अध्यक्ष

★★★★

**दिनांक २३ सप्टेंबर,२०२२ रोजी झालेल्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व सभासद जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २३ सप्टेंबर,२०२२ रोजी दुपारी ०२:३० वाजता 'भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१' येथे संपन्न झाली. सदर सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने तसेच ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. सदर सभेस खालील सभासद नागरी सहकारी बँका व सभासद जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्चे प्रतिनिधी उपस्थित होते.

| **प्रतिनिधींचे नाव** | **बँकेचे / असोसिएशन्स्चे नाव** |
|---|---|
| मा.श्री.विद्याधर अनास्कर | विद्या सहकारी बँक लि., पुणे |
| मा.श्री.रमाकांत खेतान | दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप. बँक लि., अकोला |
| मा. श्री. आनंदराव अडसूळ | सिटी को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्री. संदिप घनदाट | अभ्युदय को-ऑप.बँक.लि.,मुंबई |
| मा. श्री. ज्ञानेश्वर वांगडे | दि सातारा सहकारी बँक.लि., मुंबई |
| मा. श्री. अजय ब्रम्हेचा | दि लासलगांव मर्चंट्स को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा. श्री. अुत्तम जोशी | ठाणे भारत सहकारी बँक लि., ठाणे |
| मा. श्री. विजय ढेरे | पुणे मर्चंट्स को-ऑप. बँक.लि., पुणे |
| मा. श्री. सुनिल देवडा | ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप.बँक.लि., हिंगोली |
| मा. श्री. सतिश गुप्ता | दि चिखली अर्बन को-ऑप.बँक.लि., बुलढाणा |
| मा. श्रीमती शोभाताई सावंत | दि अण्णासाहेब सावंत अर्बन को-ऑप.बँक.लि., महाड |
| मा. डॉ. शशीताई अहिरे | दि नासिक जिल्हा महिला सहकारी बँक.लि., नाशिक |
| मा. श्री. जयवंत जालगांवकर | दापोली अर्बन को-ऑप.बँक.लि., दापोली |
| मा. श्री. अशोक शेळके | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि., अहमदनगर |
| मा. श्री. प्रकाश गवळी | जनता सहकारी बँक लि., सातारा |
| मा. श्री. संजय भेंडे | नागपूर नागरिक सहकारी बँक लि., नागपूर |
| मा. श्री. सि. बा. आडसूळ | दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असो. लि., मुंबई |
| मा. सौ. सायली भोईर | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपय. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई |
| मा. श्री. राजेंद्र हनुमंतराव शेटे | दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि., चिखली |
| मा. श्री. सुधाकर भिमाशंकर छिद्रावार | वैश्य नागरी सहकारी बँक लि., परभणी |
| मा. श्री. विश्वनाथ जयराम गव्हाणे | -//- |
| मा. डॉ. राजकुमार प्र. कलकोटे | -//- |
| मा. श्री. नंदकुमार किशनराव चिद्रवार | -//- |
| मा. श्री. जीवन माधवराव पत्तेवार | -//- |
| मा. श्री. देविदास केशवराव देशपांडे | -//- |
| मा. श्री. प्रमोद पार्टे | को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई |
| मा. श्री. सुरेश गावंडे | दि चिटणवीसपुरा सहकारी बँक लि., नागपूर |
| मा. श्री. के. एस. उटगे | सिद्धेश्वर सहकारी बँक लि., लातूर |

| | |
|---|---|
| मा. श्री. आदीनाथ सांगवे | लातूर अर्बन को-ऑप. बँक लि., लातूर |
| मा. श्री. कमल सांगवे | -//- |
| मा. श्री. वाय. एस. मशायक | -//- |
| मा. श्री. विशाल शेडगे | -//- |
| मा. श्रीमती मोमीन शाहीन | नागरिक सहकारी बँक लि., भिवंडी |
| मा. श्री. असद फकीह | -//- |
| मा. श्री. राजेश सोपानराव तांठाडे | श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीड |
| मा. श्री. शेख मंसुर अहंमद शेख सलीम | -//- |
| मा. श्री. क्षीरसागर महादेव रंगनाथ | -//- |
| मा. ॲड. दत्तात्रय डोईफोडे | -//- |
| मा. श्री. अजयानंद पवार | दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती |
| मा. श्री. गोकुलदास राऊत | -//- |
| मा. श्री. सुरेंद्र मेटे | -//- |
| मा. श्री. नारायण गावंड | जीपी पारसिक सहकारी बँक लि., ठाणे |
| मा. श्री. दशरथ पाटील | -//- |
| मा. श्री. मनोज गडकरी | -//- |
| मा. श्री. भूषण गौरी | -//- |
| मा. श्री. नितीन भोपी | -//- |
| मा. श्री. रणजीत पाटील | -//- |
| मा. श्री. राजश्री पाटील | -//- |
| मा. श्री. विक्रम पाटील | -//- |
| मा. श्री. एम. डी. पै | -//- |
| मा. श्री. यशवंत मते | -//- |
| मा. श्रीमती शिल्पा देशकर | सन्मित्र महिला नागरी सहकारी बँक मर्या., चंद्रपूर |
| मा. सौ. वासंती लोहे | -//- |
| मा. ॲड. विद्या मसाडे | -//- |
| मा. श्रीमती प्रतीक्षा उमटे | -//- |
| मा. श्रीमती सुलभा चंदनगोळे | -//- |
| मा. सौ. माधवी भागवत | -//- |
| मा. श्री. महावीर बनगर | दि म्युनिसिपल को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्री. मुकेश वसंत घुमरे | -//- |
| मा. श्री. विष्णू घुमरे | -//- |
| मा. श्रीमती वर्षा माळी | -//- |
| मा. श्री. हूकुम सिंग | दि मालाड सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. विवेक कोल्हे | साई संजिवनी को-ऑप. बँक लि., कोपरगांव |
| मा. श्री. रेवजी आव्हाड | -//- |
| मा. श्री. संभाजी रक्ताटे | -//- |
| मा. श्री. गोरख आहेर | -//- |

| | |
|---|---|
| मा. श्री. पी. एस. सभारंजक | -//- |
| मा. श्री. बापूराव बारहाते | -//- |
| मा. श्री. सुरेश उंचे | दि कुणबी सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. अनंत तांबे | -//- |
| मा. श्री. परशुराम करावडे | -//- |
| मा. श्री. पांडुरंग देवजी ठोंबरे | -//- |
| मा. श्री. मधुसुदन रामदास पाटील | दि कल्याण जनता सहकारी बँक लि., ठाणे |
| मा. डॉ. विजय आईंचवार | श्री कन्यका नागरी सहकारी बँक लि., चंद्रपूर |
| मा. श्री. प्रदीप भिमनवार | -//- |
| मा. श्री. सचिन वाणी | प्रियदर्शनी नागरी सहकारी बँक लि., जालना |
| मा. श्री. प्रदिप परिहार | -//- |
| मा. श्रीमती अनुश्री माळगांवकर | मराठा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. माधव शेट्ये | दापोली अर्बन को-ऑप. बँक लि., रत्नागिरी |
| मा. श्री. वजीर नदाफ | जनता सहकारी बँक लि., सातारा |
| मा. श्री. प्रशांत ब्रम्हे | श्रीकृष्ण को-ऑप. बँक लि., उमरेड |
| मा. श्री. दत्ताराम चाळके | अपना सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. अमित भरडे | उमरगा जनता सहकारी बँक लि., उमरगा |
| मा. श्री. योगेश राठोड | -//- |
| मा. श्री. महालिंग बाबशेट्टी | -//- |
| मा. श्री. शरण पाटील | -//- |
| मा. श्री. रविंद्र सुभेदार | एसव्हीसी को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्री. उदय गावकर | -//- |
| मा. श्री. दिलीप पेंडसे | -//- |
| मा. श्री. विजय बोथरा | अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि., अमरावती |
| मा. श्री. सुरेंद्र वरडिया | -//- |
| मा. श्री. सुदर्शन गांग | -//- |
| मा. श्री. कंवरीलाल ओस्तवाल | -//- |
| मा. श्री. किशोर बोकरिया | -//- |
| मा. श्री. विश्राम दिक्षित | दि नाशिक मर्चंट्स को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा. सौ. रजनी जातेगावकर | -//- |
| मा. श्री. सुभाष नहार | -//- |
| मा. श्री. सोहनलाल भंडारी | -//- |
| मा. श्री. कांतीलाल जैन | -//- |
| मा. श्री. हरीष लोढा | -//- |
| मा. श्री. आबा सोनजे | -//- |
| मा. श्री. आनंद बागमार | -//- |
| मा. श्री. संतोष धाडीवाल | -//- |
| मा. श्री. प्रशांत दिवे | -//- |
| मा. श्री. रोशन आढाव | -//- |

| | |
|---|---|
| मा. श्री. शंतनू जोशी | दि अकोला अर्बन को-ऑप. बँक लि., अकोला |
| मा. श्री. राजन सोनटक्के | -//- |
| मा. श्रीमती दीपा दाढे | भगिनी निवेदिता सहकारी बँक लि., पुणे |
| मा. श्रीमती स्मिता देशपांडे | -//- |
| मा. श्रीमती स्वाती काळे | -//- |
| मा. श्रीमती मीना गायकवाड | -//- |
| मा. श्री. सुभाष विठ्ठल मोहिते | पुणे पीपल्स को-ऑप. बँक लि., पुणे |
| मा. श्री. दिलीप वग्याणी | दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँक लि., सांगली |
| मा. श्री. विनोद पाटील | -//- |
